येत्या 22 ऑगस्टला प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात येणार

e Paper



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | शुक्रवार दिनांक 08/08/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 175 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# राष्ट्रवादी वतीने मनपावर भव्य जनआक्रोश मोर्चा!



## हजारोंच्या संख्येने नागरिकांचा सहभाग !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने चुकीच्या पद्धतीने सादर केलेल्या प्रारूप विकास आराखड्याच्या विरोधात गुरुवारी (दि. ०७) रोजी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या वतीने भव्य धडक मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात हजारोंच्या संख्येने पिंपरी चिंचवड शहरातील नागरिक सहभागी झालेले पहावयास मिळाले.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका वतीने विकास आराखडा प्रसिद्ध करण्यात आला, परंतु या विकास आराखड्यात मनमानीपणे आरक्षणे टाकण्यात आली. यामुळे पिंपरी चिंचवड शहरातील अनेक नागरिकांची घरे बाधित होत आहेत. तसेच चुकीच्या आरक्षणामुळे अनेकांना बेघर व्हावे लागणार आहे, मनपा प्रशासनाच्या या मनमानी कारभाराला आळा घालण्यासाठी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल यांच्या मार्गदर्शनात या जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले.

या मोर्चात राष्ट्रवादी पक्षाचे शहराध्यक्ष योगेश बहल, महाराष्ट्र राज्य विधानसभेचे उपाध्यक्ष आमदार अण्णा बनसोडे,माजी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, विठ्ठल उर्फ नाना काटे, माजी आमदार विलास लांडे, माजी नगरसेवक अजित गव्हाणे, डब्बू आसवानी, महिला शहराध्यक्ष कविता आल्हाट, प्रशांत शितोळे, युवक शहराध्यक्ष शेखर काटे, माजी नगरसेवक कैलास बारणे, सतीश दरेकर, संभाजी बारणे, बापू कातळे, ज्योती गोफणे, मनीषा गटकळ, संगीता नानी कामाने, संतोष बारणे, माया बारणे, अकबर भाई मुल्ला, मयूर कलाटे, रमजान सय्यद, अनुराधा गोफणे, श्याम लांडे, पंकज भालेकर, यश साने, संजय जगताप, संजय वाबळे, विकास साने, राजेंद्र जगताप, राजू बनसोडे, नारायण बहिरवाडे, राजेंद्र सिंग वालिया, प्रसाद कोलते, अजित शितोळे, उषा वाघेरे, फजल भाई शेख, विक्रांत लांडे, प्रवीण बारणे, प्रशांत सपकाळ, कविता खराडे धनंजय भालेकर,गोरक्षनाथ पाषाणकर, शरद बारणे, विशाल पवार, सचिन बारणे, अभिजीत आल्हाट, तुषार ताम्हाणे यांच्यासह राष्ट्रवादी पक्षाचे अनेक पदाधिकारी आजी-माजी नगरसेवक व कार्यकर्ते शेकडोचे संख्येने उपस्थित होते. यावेळी अनेक नेत्यांनी पिंपरी चिंचवडकरांवर अन्याय करणारा विकास आराखडा रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली.






# पिंपरी कॅम्प मध्ये पोलीसगस्त वाढवा, व्यापाऱ्यांना संरक्षण द्या - श्रीचंद आसवानी

## पिंपरी पोलिस चौकी मध्ये तक्रार घेण्यास पुन्हा सुरुवात करा, पिंपरी मर्चंट फेडरेशन ची मागणी

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी कॅम्प परिसरात पूर्वी प्रमाणे २४ तास पोलीस तैनात करावे, तसेच पूर्वी बाजारपेठे मध्ये दुचाकीवरील मार्शल राऊंड मारून पोलीस पहारा देत होते, ते पुन्हा सुरू करावे. पिंपरी मंडई जवळ पोलीस चौकी आहे. तेथे असणारा लँडलाईन फोन मागील पाच वर्षांपासून बंद आहे, तो ताबडतोब सुरू करावा. एखादी दुर्घटना, चोरी, मारामारी, पाकीटमारी, अपघात अशा घटना घडल्या की संपर्क करणे सोपे होते. यापूर्वी या पोलीस चौकीमध्ये देखील तक्रार नोंद करून घेतली जात होती ते आता होत नाही.

बाजारपेठेपासून पिंपरी पोलीस स्टेशन हे पुणे मुंबई महामार्गावर ४ ते ५ किलोमीटर लांब आहे. तेथे तक्रार नोंद करायला गेलो की तेथील ठाणे अंमलदार नोंद करून घेण्याऐवजी तक्रार करण्यास केलेल्या व्यापाऱ्यांना अनेक प्रश्न विचारून हैराण करतात. पथारी टाकून बसलेल्यांना हटवण्या ऐवजी त्यांनाच संरक्षण देऊन पोलीस दुकानदार, व्यापाऱ्यांना त्रास देतात. मागील आठवड्यात पिंपरी कॅम्पातील व्यापाऱ्यावर झालेल्या गोळीबार घटनेतील आरोपीला कडक शिक्षा द्यावी, अशा मागण्या करीत पिंपरी कॅम्प मधील व्यापाऱ्यांनी गुरुवारी (दि. ७) बाजारपेठ बंद ठेऊन पोलिसांचा निषेध केला.



# पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे – आयुक्त शेखर सिंह

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी चिंचवड शहरात उत्सवांचा आनंद घेताना पर्यावरणाचे संरक्षण हे आपले सामूहिक कर्तव्य आहे. यंदाही सार्वजनिक गणेश मंडळे, स्वयंसेवी संस्था, नागरिक यांच्या सहकार्याने प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याबाबत जनजागृती करण्यासोबत विविध उपक्रम राबवण्याचे नियोजन आहे. त्या अनुषंगाने महापालिकेच्या सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिले.आगामी गणेशोत्सवाच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने सार्वजनिक गणेश मंडळे, स्वयंसेवी संस्था, पर्यावरण प्रेमी यासह नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेली बैठक आयुक्त सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झाली. महापालिका अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता अनिल भालसाकळे, माणिक चव्हाण, उपायुक्त सचिन पवार, अण्णा बोदडे, सहायक आयुक्त निवेदिता घार्गे, किशोर ननवरे, अश्विनी गायकवाड, अमित पंडित, अजिंक्य येळे, क्षेत्रीय अधिकारी तानाजी नरळे, कार्यकारी अभियंते सोहन निकम, बी. पी. लांडे, सचिन नांगरे, चंद्रकांत मुठाळ, शिवराज वाडकर, सुनील नरोटे, हेमंत देसाई, सुनील शिंदे, विजय जाधव, उपअभियंता योगेश आल्हाट, प्रशांत कोतकर, संजय जाधव यांच्यासह गोराबा काका मंडळाचे अध्यक्ष बाबासाहेब कुंभार, कुंभार समाज महाराष्ट्राचे सरचिटणीस संजीव भालेराव, अष्टविनायक मंडळाचे रमेश करटकर, विश्व हिंदू परिषदेचे विजय देशपांडे, शिवशंकर घोडके , पर्यावरण संरक्षण गतिविधी संस्थेचे सुधीर माडलकर, दीपक लापस, श्रीस्वामी समर्थ केंद्राच्या सरोज दाणी, मूर्तिकार महेश डाखवे, राजाराम डाखवे, मृणालिनी पाटील, लिबर्टी अर्थ वेअर आर्ट्सच्या तृप्ती मानुरकर, इको एक्झिस्ट फाउंडेशनच्या शामा देव, मैत्रेय घोरपडे आदी उपस्थित होते.आयुक्त सिंह यांनी बैठकीत उपस्थितांना मार्गदर्शन करताना महापालिकेच्या पर्यावरणपूरक उपक्रमांची माहिती दिली. यंदाच्या गणेशोत्सवात मूर्ती विसर्जनाच्या व्यवस्थेचा दर्जा वाढवण्यासाठी महापालिकेने कृत्रिम हौदांची संख्या १६ वरून ३२ वर नेण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली. शाडू मातीच्या मूर्तींसाठी विशेषतः १६ नवीन कृत्रिम हौद उभारले जाणार असून पीओपी मूर्तींसाठी स्वतंत्र हौदांची व्यवस्था केली जाणार आहे. यामुळे मूर्तींचे योग्य वर्गीकरण, पर्यावरणपूरक विसर्जन आणि सुलभ व्यवस्थापन शक्य होईल. मूर्ती विक्रेत्यांसाठी ऑनलाइन नोंदणी प्रणाली लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. नागरिक, गणेश मंडळे, स्वयंसेवी संस्था आणि प्रशासन यांनी एकत्रितपणे काम करून शहराचा उत्सव अधिक पर्यावरणस्नेही आणि आदर्श व्हावा. गणेश मंडळे, स्वयंसेवी संस्था आणि प्रशासन यांनी एकत्रितपणे पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्यासाठी समन्वयाने काम करावे, असे आवाहनही आयुक्त सिंह यांनी केले.

'पुनरावर्तन' मोहीम राबवली जाणारपिंपरी चिंचवड महापालिकेत यंदा गणेशोत्सव काळात इको एक्झिस्ट फाउंडेशन या संस्थेच्या मदतीने 'पुनरावर्तन' मोहीम राबवली जाणार आहे. या मोहिमेंतर्गत शाडू मातीच्या गणेश मूर्तींचे विसर्जन केल्यानंतर ती माती पुन्हा संकलित करून मूर्तिकारांपर्यंत पोहोचवण्याचे काम केले जाणार आहे. त्यानंतर मूर्तिकार ती माती पुन्हा मूर्तीसाठी वापरू शकणार आहेत.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करताना महापालिकेच्या प्रत्येक विभागाने या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा. पीओपी आणि शाडू मातीच्या मूर्तींचे विसर्जन करण्यासाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महापालिकेने नियोजन सुरू केले आहे. नागरिकांनी देखील पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यास प्राधान्य देऊन महापालिकेला सहकार्य करावे.

**विजयकुमार खोराटे**
अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

गणेशोत्सव काळात विसर्जन व्यवस्थापन अधिक व्यापक स्वरूपात राबवण्याच्या दृष्टीने कृत्रिम हौदांची संख्या वाढवण्याचे नियोजन आहे. आज झालेल्या बैठकीत विविध स्वयंसेवी संस्थांकडून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या अनुषंगाने आलेल्या सूचनांची नोंद घेण्यात आली आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यावर देखील भर दिला जाणार आहे.

**संजय कुलकर्णी**
मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका

# येत्या 22 ऑगस्टला प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात येणार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




महापालिका निवडणूक ओबीसी आरक्षणासह घेण्याचा मार्ग मोकळा झाल्याने पिंपरी-चिंचवड या महापालिकेने प्रारूप प्रभाग रचनेचा आराखडा मंगळवारी राज्याच्या नगरविकास विभागाला सादर केला. या आरखड्यानुसार अनुसूचित जातीसाठी (एससी) २०, अनुसूचित जमाती (एसटी) तीन, इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) ३५ आणि सर्वसाधारण (खुला) प्रवर्गासाठी ७० जागा राखीव राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.राज्य निवडणूक आयोगाने आराखड्याला मंजुरी दिल्यानंतर २२ ऑगस्टला प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात येणार असून, २२ ते २८ ऑगस्ट या कालावधीत हरकती व सूचना मागविण्यात येणार आहेत. या आराखड्यामध्ये महिलांसाठी ६४ आणि पुरुषांसाठी ६४ जागा असणार आहेत. प्रभाग रचना २०१७ प्रमाणेच तयार करण्यात आली असून वाढत्या लोकसंख्येमुळे प्रभागांतील आरक्षणांमध्ये बदल होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.महापालिकेची निवडणूक २०१७ प्रमाणेच चार सदस्यीय प्रभाग पद्धतीने होणार आहे.सन २०११ च्या १७ लाख २७ हजार ६९२ लोकसंख्येप्रमाणेच प्रभाग रचना तयार केली आहे. तळवडे-चिखली भागातून प्रभाग रचना सुरू करून सांगवी-दापोडी अशा उतरत्या क्रमाने पूर्ण केली. या प्रभाग रचनेचा प्रारुप आराखडा मंगळवारी राज्य शासनाच्या नगरविकास विभागाला सादर करण्यात आला.

एक प्रभाग ४९ हजार ते ५९ हजार मतदार संख्येचा असणार आहे. महापालिकेचे एकूण ३२ निवडणूक प्रभाग असणार आहेत. या प्रभागामधून १२८ नगरसेवकांना मतदार निवडून देतील. त्यातील ६४ जागांवर महिला नगरसेविका असतील. १२८ पैकी अनुसूचित जातीसाठी २० (महिलांसाठी दहा), अनुसूचित जमातीसाठी तीन (महिलांसाठी दोन), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी ३५ (महिलांसाठी १८) जागा राखीव आहेत. तर, सर्वसाधारणसाठी ७० (महिलांसाठी २३) जागा असणार आहेत.

# निगडी-चिंचवड रस्ता बनला मृत्यूचा सापळा!

## माजी नगरसेवक विजय शिंदे यांचा प्रशासनावर हल्लाबोल



शहराच्या विकासासाठी महत्त्वाकांक्षी मानल्या जाणाऱ्या महा मेट्रोच्या कामामुळे नागरिकांना आता जीवघेणा अनुभव येत आहे. भक्ती-शक्ती चौक, निगडी ते चिंचवड स्टेशन चौक या मार्गावर सुरू असलेल्या कामामुळे रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. मोठे खड्डे, धूळ आणि सततची वाहतूक कोंडी यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. महामेट्रोच्या निष्काळजीपणामुळे हा रस्ता अपघातांना निमंत्रण देणारा ठरत असून, माजी नगरसेवक विजय शिंदे यांनी मेट्रो आणि पिंपरी चिंचवड महापालिका अधिकारी यांच्यासोबत प्रत्यक्ष चिंचवड स्टेशन ते निगडी आणि निगडी- आकुर्डी- चिंचवड स्टेशन रस्त्यांची पाहणी केली. तसेच, प्रशासनावर जोरदार हल्लाबोल करत तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

या गंभीर प्रश्नावर आता माजी नगरसेवक विजय शिंदे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. त्यांनी थेट महापालिकेचे व मेट्रोच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत रस्त्याची पाहणी करून प्रशासनावर जोरदार हल्लाबोल केला. "मेट्रोचा हा मनमानी कारभार थांबला पाहिजे. नागरिकांच्या जिवाशी खेळण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला?" अशा कठोर शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला. यावेळी, पिंपरी चिंचवड महापालिकेचे सह शहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, कार्यकारी अभियंता अभिमान भोसले, विपिन थोरमोडे, महामेट्रो चे प्रकल्प अधिकारी वाय. बी. सिंग, धनंजय योगानंद, कुलकर्णी, उपेंद्र सिंग, मिश्रा आदि उपस्थित होते. मेट्रोच्या कामामुळे रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत, जे वेळेवर बुजवले जात नाहीत. यामुळे दुचाकीस्वार घसरून पडण्याचे प्रकार वाढले असून, अनेक नागरिक जखमी झाले आहेत. खड्डयांमुळे वाहनांचे मोठे नुकसान होत आहे. टायर पंक्चर होणे, सायलेंसर तुटणे किंवा इतर भागांचे नुकसान होणे असे प्रकार नित्याचेच झाले आहेत, त्यामुळे नागरिकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. हा रस्ता औद्योगिक वसाहती, शैक्षणिक संस्था आणि रुग्णालयांना जोडणारा असल्याने दररोज हजारो वाहने यावरून ये-जा करतात. मेट्रो प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांना शारीरिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

मेट्रोच्या कामामुळे रस्त्याचा मोठा भाग व्यापला गेल्याने उर्वरित रस्ता वाहतुकीसाठी खूपच अरुंद झाला आहे. यामुळे वाहनांची मोठी गर्दी होऊन वाहतूक कोंडीची समस्या गंभीर झाली आहे. सकाळी आणि संध्याकाळी कामाच्या वेळी ही कोंडी अधिक त्रासदायक ठरते, ज्यामुळे कामावर वेळेवर पोहोचणे कठीण होते. सर्वात संतापजनक बाब म्हणजे, महामेट्रोने पावसाळ्यापूर्वी रस्त्याची दुरुस्ती केली नाही. यामुळे पालखी सोहळ्यादरम्यान वारकऱ्यांची मोठी गैरसोय झाली. त्यांना चिखल आणि साचलेल्या पाण्यातून जावे लागले, ज्यामुळे मेट्रो प्रशासनाची असंवेदनशीलता स्पष्ट दिसून येते.

या वेळी शिंदे यांनी अनेक सूचना केल्या. रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून सर्व खड्डे बुजवा. कामाच्या ठिकाणी जबाबदार अधिकाऱ्यांचे नाव आणि संपर्क क्रमांक स्पष्टपणे दर्शनी भागात लावा. यापुढे रस्त्यावरील खड्डयांमुळे अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी मेट्रो प्रशासनाची असेल, असे सांगत या मागण्या मान्य न झाल्यास, तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही विजय शिंदे यांनी दिला आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी त्यांनी प्रशासनाला कठोर शब्दांत सुनावले आहे. मेट्रोच्या या कामामुळे शहराची शोभा वाढण्याऐवजी नागरिकांचा जीव धोक्यात येत असल्याचे भयावह चित्र यानिमित्ताने समोर आले आहे.

महामेट्रोच्या कामामुळे निगडी ते चिंचवड रस्त्याची झालेली दुरवस्था आणि त्यामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासावर माजी नगरसेवक विजय शिंदे यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. ते म्हणाले, "विकासकामांना आमचा विरोध नाही, पण मेट्रो प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत, ज्यामुळे अपघात वाढले आहेत. तसेच, वाहतूक कोंडीमुळे नागरिकांचा वेळ आणि पैसा वाया जात आहे. प्रशासनाकडे अनेक तक्रारी करूनही कोणतीही कारवाई होत नाही. जर मेट्रो प्रशासनाने तातडीने उपाययोजना केल्या नाहीत, तर आम्ही शांत बसणार नाही. नागरिकांना सोबत घेऊन आम्ही तीव्र आंदोलन करू."

**शीतल उर्फ विजय गोरख शिंदे**
भाजपा मा.नगरसेवक
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
शुक्रवार दिनांक 08/08/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# प्रशासनाने नागरिकांच्या समस्यांचा पाठपुरावा करा : आ.शंकर जगताप

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : महापालिका प्रशासनाने देखील नागरिकांच्या समस्या समजून घेत त्या प्रभावीपणे देखरेखीखाली ठेवून त्यावर सातत्याने पाठपुरावा करावा, प्रशासन व पदाधिकाऱ्यांनी परस्पर सहकार्याने काम केल्यास शहरातील प्रश्न सोडवणे सुलभ होईल, असे मत आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केले. 'आमदार आपल्या दारी' या उपक्रमाचे आयोजन नवी सांगवी येथे गुरुवार (दि. ७ ऑगस्ट) रोजी सकाळी करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.**




आमदार जगताप म्हणाले की, "महापालिका प्रशासनाने नागरिकांच्या आरोग्य, वाहतूक, ड्रेनेज अशा समस्यांचे गांभीर्याने देखरेख करावी आणि त्यावर वेळोवेळी पाठपुरावा करत अडचणींचा ठोस उपाय शोधावा. आमदार म्हणून आम्ही आमच्या पातळीवर हा पाठपुरावा करत असतो. मात्र प्रशासन आणि पदाधिकारी एकत्रितपणे कार्यरत राहिल्यास समस्या अधिक तत्परतेने सुटू शकतात." वाहतूक विभागाबाबत बोलताना त्यांनी नमूद केले की, "वाहतूक पोलिसांनी नागरिकांना लहान चुका दाखवून शिस्त लावल्यास भविष्यातील अपघात किंवा अडथळे टाळता येतील."

नागरिकांनी मांडलेल्या विविध ७५३ तक्रारींचे तात्काळ निराकरण 'आमदार आपल्या दारी' या उपक्रमादरम्यान नागरिकांनी आरोग्य, पाणीपुरवठा, ड्रेनेज, वाहतूक, शासकीय दाखले, रेशन कार्ड, वीजपुरवठा यांसारख्या विविध विभागांशी संबंधित एकूण ७५३ तक्रारी मांडल्या होत्या. या तक्रारींचे स्थानिक प्रशासन व विभागीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तात्काळ निराकरण करण्यात आले, ही या उपक्रमाची विशेष बाब ठरली. या कार्यक्रमाला माजी महापौर उषा तथा माई ढोरे, माजी नगरसेवक हर्षल ढोरे, संतोष कांबळे, माजी नगरसेविका शारदा सोनवणे, उषा मुंडे, माधवी राजापुरे, तसेच महापालिकेच्या समाज विकास विभागाच्या अधिकारी वैशाली सागाडे, वाहतूक विभागाचे पीएसआय राजाराम काकडे, सांगवी पोलिस ठाण्याचे पीएसआय ढगे, स्थापत्य विभागाचे कार्यकारी अभियंता सुधीर वाघमारे, जलनिस्सरण विभागाचे कार्यकारी अभियंता विजय ओव्हाळ, अ प्रभागाचे आरोग्य अधिकारी शिंदे, तहसीलदार जयराज देशमुख, रेशनिंग विभागाचे क्षीरसागर, विद्युत विभागाचे गवारी, पंचरसोत्तम समाज कल्याण विभागाचे प्रकल्प अधिकारी सतीश बंडगर हे उपस्थित होते.

# भाजपा शहराध्यक्ष काटे यांनी टोचले नगरसेवक व पदाधिकाऱ्यांचे कान..!

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड शहरातील प्रदेश व जिल्हा पदाधिकारी व नगरसेवक यांची महत्वाची बैठक संपन्न झाली.**

**या बैठकीत गेल्या दोन महिन्यात झालेल्या कार्यक्रमांचा आढावा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी घेतला. शत्रुघ्न काटे यांनी महापालिका निवडणुकीच्या तोंडावर यशस्वी कार्यक्रमांचा धडाका लावला आहे.**






पक्षाचे कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्या बरोबरच त्यांचे संघटनेत मोठे सकारात्मक बदल करण्याच्या दृष्टीने कठोर पावले उचलल्याचे स्पष्ट झाले आहे कारण गेल्या चार दिवसात जिल्हा समिती गठीत करण्यासाठी त्यांनी तीनशे पेक्षा जास्त कार्यकर्त्यांच्या समक्ष मुलाखती घेतल्या व त्यांचे म्हणणे ऐकून घेतले.

त्यामुळे काल झालेल्या बैठकीत त्यांनी लाभाची पदे घेणाऱ्या पण संघटनेच्या कामात न येणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे कान टोचले व म्हणाले की जे कार्यकर्ते पक्षसंघटनेचे प्रामाणिकपणे कार्य करतात व ज्यांनी पक्षसंघटनेत काम करण्यासाठी मुलाखत दिली त्याच कार्यकर्त्यांना जिल्हा समितीत प्राधान्य दिले जाणार तसेच जे नगरसेवक, ज्यांना लाभाची पदे मिळाली आहेत किंवा जे इच्छुक उमेदवार आहेत त्यांनी जर पक्षसंघटनेचे उतरून काम केले तरच त्यांचा पदासाठी किंवा उमेदवारीसाठी विचार केला जाणार आणि जे संघटनेचे काम करणार नाहीत व उमेदवारी आणि पदाकरिता पुढे पुढे करतात त्यांची सर्व माहिती पक्षश्रेष्ठींना कळविली जाईल त्यामुळे भविष्यात ज्यांना उमेदवारी पाहिजे किंवा लाभाची पदे हवी असतील त्यांना पक्षसंघटनेत काम करावे लागेल व संघटनेचे काम करीत असताना रिसल्ट देखील द्यावा लागेल तरच त्यांचा विचार केला जाईल असे शहराध्यक्ष काटे यांनी निक्षून सांगितले शिवाय पदे किंवा उमेदवाऱ्या मिळविण्यासाठी कोण कोणाच्या जवळचा असो किंवा लांबचा हे समीकरण भाजप सारख्या संघटनेत चालत नाही मी देखील चालू देणार नसल्याचे हे सांगण्यास ते विसरले नाही..!

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
शुक्रवार दिनांक 08/08/२०25
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# राष्ट्रीय महामार्ग 48 चे रुंदीकरण करा - खा. श्रीरंग बारणे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे, पिंपरी-चिंचवडमधून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ ची दुरवस्था झाली आहे. रस्त्यांवरील खड्डे व अरुंद लेनमुळे वाहतूक कोंडी व अपघात वाढले आहेत. त्यामुळे या महामार्गाची सुधारणा करावी. रस्त्याची रुंदी वाढवावी, नव्याने डांबरीकरण करावे, उड्डाणपूल बनविण्यात यावेत. वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे साकडे मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना घातले.

खासदार बारणे यांनी दिल्लीत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. या महामार्गाची परिस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून दिली. खासदार बारणे म्हणाले, पुणे शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ हा एक महत्त्वाचा मार्ग आहे. कार्ला फाटा, वडगाव फाटा, तळेगाव फाटा आणि देहूरोड फाटा या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होते. उड्डाणपूलांची कमतरता आणि रुंदीकरणाचा अभाव यामुळे या मार्गावर वाहतुकीची स्थिती अधिकच बिकट झाली असून, नागरिकांच्या दैनंदिन प्रवासावर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. या महामार्गाच्या उन्नयनामुळे पुणे शहरातून होणारी वाहतूक अधिक सुरळीत होईल आणि प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल.

पिंपरी-चिंचवड शहराच्या हद्दीतील राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ च्या लगतच्या सेवा रस्त्यांचा विस्तार झाल्यास, वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. हा मार्ग सद्यस्थितीत खराब अवस्थेत असून दुरुस्ती व रुंदीकरणाची तातडीची गरज आहे. रस्त्यांवरील खड्डे व अरुंद लेनमुळे वाहतूक कोंडी व अपघात वाढले आहेत. अनेक ठिकाणी राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ अरुंद असल्याने वाहतूक कोंडी होते. त्यामुळे रस्त्याची रुंदी वाढवावी. जुन्या आणि खराब झालेल्या रस्त्यांवर नवीन डांबरीकरण करून, रस्त्याची गुणवत्ता सुधारावी. यामुळे प्रवासाचा वेग वाढेल आणि सुरक्षितता देखील वाढेल. या उपाययोजना त्वरित केल्यास प्रवास सुरक्षित, जलद व सुलभ होईल.

पुणे हे महाराष्ट्राच्या मध्यवर्ती ठिकाणी असून कोल्हापूर, सोलापूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर व नाशिक यांसारख्या शहरांशी जोडणारे राष्ट्रीय महामार्ग आहेत. वाढत्या वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर या मार्गांचे तातडीने रुंदीकरण आवश्यक आहे. यामुळे प्रवास सुलभ होईल, व्यापाराला गती मिळेल आणि अपघातांचे प्रमाण कमी होईल. या मार्गांचे विस्तारीकरण, उड्डाणपुलांची निर्मिती व पायाभूत सुधारणा केल्यास पश्चिम भारताचा वेगवान व शाश्वत विकास अधिक सुलभ होईल. या कामांसाठी तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी खासदार बारणे यांनी केली.

# रोजगार हमी योजनेंतर्गत सुधारणा, नव्या उपक्रमांची आखणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मावळ : महाराष्ट्र विधानभवन येथे रोजगार हमी योजना समितीची महत्त्वपूर्ण बैठक बुधवार, ६ ऑगस्ट रोजी समितीचे प्रमुख आमदार सुनील शेळके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. मनरेगा योजनेंतर्गत सुधारणा, पायलट प्रकल्प आणि ग्रामीण मजुरांच्या हितासाठी ठोस उपाययोजनांवर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.बैठकीत २१ ते २३ एप्रिल २०२२ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यात झालेल्या दौऱ्याचा आढावा घेण्यात आला. विभागीय सचिवांकडून साक्ष घेण्यात आली आणि अनुपालन अहवालावर विचारमंथन करण्यात आले.सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मनरेगा जॉब कार्डधारकांना मिळणाऱ्या वेतनात वाढ करण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठवण्यात आलेल्या प्रस्तावावर सातत्याने पाठपुरावा करण्याचे निर्देश आमदार सुनील शेळके यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. त्यांनी स्पष्ट केले की, ग्रामीण मजुरांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देणे हे सरकारचे प्रमुख उद्दिष्ट आहे.बैठकीत मनरेगा योजनेंतर्गत एक पायलट प्रकल्प हाती घेण्याची सूचना करण्यात आली. त्याचप्रमाणे, राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करून बांबू लागवड, फळबाग लागवड, वृक्षारोपण, मृद व जलसंधारण आणि रोपवाटिका व्यवस्थापन यामध्ये प्रभावी कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायती, लाभार्थी व अधिकाऱ्यांना पारितोषिक देण्याचा प्रस्ताव सादर झाला. याला विभागीय सचिवांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.सिंधुदुर्ग जिल्ह्यात जिल्हा परिषदेमार्फत राबवण्यात येणाऱ्या घरकुल योजनांमध्ये गती आणण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले गेले. याशिवाय, मंजूर कामांमध्ये अंमलबजावणीत अडथळे येऊ नयेत यासाठी स्थानिक स्तरावर आधीच स्थळ पाहणी करणे आणि लोकप्रतिनिधींचा सल्ला घेऊनच काम मंजूर करण्याचे निर्देशही देण्यात आले. सिंधुदुर्ग जिल्ह्यात तयार होणाऱ्या रोपांची इतर जिल्ह्यांमध्ये विक्री करण्यात यावी, यामुळे स्थानिक मजुरांना आर्थिक लाभ होईल आणि योजनेचे उद्दिष्टही पूर्ण होईल, असे मत मांडण्यात आले.

या बैठकीस आमदार शंकर मांडेकर, काशिनाथ दाते, बापूसाहेब पठारे, सुधाकर अडबाले, शिरीषकुमार नाईक, रोजगार हमी योजना विभागाचे सचिव, कृषी विभागाचे प्रधान सचिव, जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपवनसंरक्षक सावंतवाडी आदी अधिकारी उपस्थित होते. रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीत गतिमानता आणण्यासाठी आणि मजुरांच्या हितासाठी ठोस निर्णय घेणारी ही बैठक आमदार सुनील शेळके यांच्या नेतृत्वाखाली परिणामकारक ठरली.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968